पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२६१/२०१४
दिनांक : ११/०३/२०१४

प्रति,

मा. ....................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक **२०/०३/२०१४** रोजी दुपारी **२.००** वाजता आयोजित केलेबाबत...

मा.महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची **माहे मार्च २०१४** ची मासिक मा.महापालिका सभा **गुरुवार** दिनांक **२०/०३/२०१४** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

**सूचना**

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक २८**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च - २०१४ ची मासिक मा.महापालिका सभा गुरुवार दिनांक २०/०३/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

---------------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

---------------

**<u>मा.स्थायी समितीचे ठराव</u>**

**विषय क्रमांक १) संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. वैद्य/४/कावि/१३३/२०१४,
दि. ६/०२/२०१४
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. ६००९ दि.१३.०२.२०१४

राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे केंद्रशासनाच्या NUHM योजनेअंतर्गत पी.आय.पी.मंजूरीसाठी मान्यता मिळणे तसेच शहरी आरोग्य केंद्रे स्थापन करणे, त्याचे Relocation करणे, मुलभूत सुविधा उदा.वीज, पाणी, स्थापत्य विषयक कामकाज करुन देणे, तसेच फर्निचर, वैद्यकीय उपकरणे, औषधे उपलब्ध करणे, संगणक उपलब्ध करणे यासाठी राज्य शासनाकडून निधी/अनुदान उपलब्ध होणे अपेक्षित आहे. व या निधीतून महापालिकेस या योजनेकामी खर्च करावयाचा आहे. योजनेसाठी प्राप्त निधीतून खर्च करण्यास व सदरचे अधिकार आयुक्त यांना प्रदान करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

**<u>मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे / कामे</u>**

**विषय क्रमांक 2) संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. प्रशासन/८/कावि/१७५/२०१४
दिनांक २५/०२/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने क्षयरोग तपासणीसाठी आणलेले मशीन वापराविना पडून असलेबाबत विधानमंडळ सन २०१३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ३७९२० व विधानसभा तारांकित प्रश्न क्र.१०६१६७ उपस्थित झालेले आहेत. याबाबत मा.मंत्री महोदयांनी विधानसभेमध्ये दिलेल्या अश्वासनानुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाने दि.२०/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये विनावापर मशीन पडून राहण्यास जबाबदार असणा-या अधिकारी व कर्मचारी यांची चौकरी करुन संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही

करणेबाबत आदेश दिलेले आहेत.  सदर प्रकरणी द्विसदस्यीय समितीने सादर केलेल्या प्राथमिक अहवालानुसार BACTEC® MGIT™ 960 System for Micro Bacteria Testing with Accessories क्षयरोग तपासणी उपकरण खरेदी निविदा प्रक्रियेमध्ये व मशीनच्या किंमतीबाबतचे कामकाजात गंभीर स्वरुपाची अनियमितता आढळून आल्याने दिनांक २३/०४/२०१३ चे आदेशान्वये श्री.लोखंडे तानाजी मन्याबा, भांडारपाल व श्री.गराडे ज्ञानदेव नामदेव, उपलेखापाल या कर्मचा-यांना सेवानिलंबित करुन खातेनिहाय चौकशीकामी आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

द्विसदस्यीय समितीने सादर केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालानुसार

१. BACTEC® MGIT™ 960 System for Micro Bacteria Testing with Accessories क्षयरोग तपासणी उपकरण खरेदीच्या निविदा प्रक्रिया कामकाजात आढळलेल्या अनियमित बाबीस डॉ.नागकुमार कुणचगी, निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी व डॉ.राजशेखर अय्यर, निवृत्त वैद्यकीय संचालक,

२. सदर उपकरणाच्या किंमतीबाबतचे कामकाजात आढळलेल्या अनियमित बाबीस डॉ.नागकुमार कुणचगी, निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी

३. BACTEC® MGIT™ 960 System for Micro Bacteria Testing with Accessories क्षयरोग तपासणी उपकरण विनावापर बंद राहणेस डॉ.नागकुमार कुणचगी, निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, डॉ.राजशेखर अय्यर, निवृत्त वैद्यकीय संचालक, डॉ.आनंद जगदाळे, निवृत्त वैद्यकीय अधिक्षक वाय.सी.एम.एच.

हे अधिकारी जबाबदार असल्याचा प्राथमिक निष्कर्ष प्राप्त झालेला आहे.

तरी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील 27 (2) (ब) नुसार कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापुर्वी विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर शासनाच्या मंजूरीशिवाय ती चालू केली जाणार नाही, अशी तरतुद आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम 45 मधील तरतुदीनुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची “नियुक्ती प्राधिकारी” महापालिका ही आहे. त्यामुळे महापालिका अधिका-यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीनंतर विभागीय कार्यवाही करण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. डॉ.नागकुमार कुणचगी, निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, डॉ.राजशेखर अय्यर, निवृत्त वैद्यकीय संचालक व डॉ.आनंदराव जगदाळे, निवृत्त वैद्यकीय अधिक्षक हे महापालिका सेवेमधून निवृत्त झालेले असून प्राथमिक चौकशी अहवालानुसार BACTEC® MGIT™ 960 System for Micro Bacteria Testing with Accessories या क्षयरोग तपासणी उपकरण प्रकरणातील अनियमित बाबी व सदर उपकरण विनावापर बंद रहाण्यास त्यांची सकृत दर्शनी जबाबदारी निश्चित होत आहे. यास्तव प्रकरणी डॉ.नागकुमार कुणचगी, निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, डॉ.राजशेखर अय्यर, निवृत्त वैद्यकीय संचालक व डॉ.आनंदराव जगदाळे, निवृत्त वैद्यकीय अधिक्षक यांच्या

विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ मधील तरतुदींच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ मध्ये विनिर्दिष्ठीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार, प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करणे, चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत व एकुण प्रकरणी विभागीय कार्यवाही प्रस्तावित करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्याबाबत मान्यता घेणेबाबत विचार करणे.

## समित्यांचे अहवाल

## मा.विधी समिती

**विषय क्रमांक ३)** **अ)** दिनांक १७/१/२०१४,७/२/२०१४ व १०/०२/२०१४चा सभावृत्तांत कायम करणे.
**ब)** दिनांक ०७/०२/२०१४ व १०/२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.

## मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक ४)** **अ)** दिनांक २२/०१/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.
**ब)** दिनांक १२/०२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२६१/२०१४
दिनांक : ११/०३/२०१४

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स)
नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

माहे मार्च २०१४ चे मा. महापालिका सभेमध्ये मा. सौ.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांना विचारावयाचे प्रश्न -

---

प्रश्न १. अ) पिं.चिं.मनपाने पुररेषा सर्व्हेक्षण करण्यासाठी पाटबंधारे विभागास २००७ साली विनंती केल्यानंतर पाटबंधारे खात्याने महानगरपालिकेस पुररेषेबाबत कोण कोणते नकाशे, सर्वेक्षण अहवाल दिले. त्या संदर्भातील सर्व पत्रव्यवहारांची संपूर्ण सविस्तर कागदपत्रांसह माहिती मिळावी.

ब) पुरनियंत्रण रेषेबाबत अंमजबजावणी होणेपूर्वी काही बांधकामांना परवानगी मिळाली त्यानुसार काही बांधकामे पूर्ण झाली आहेत व काहींना सुधारित बांधकाम परवानगी दिली आहे. जी आजतागायत बांधकामे चालू आहेत त्यांना सु.बा.परवानगी देताना कोणत्या नियमाच्या आधारे दिली गेली. त्याची माहिती तसेच जर त्यांनी कोर्टाकडून या संदर्भात काही आदेश प्राप्त केले असल्यास ते व त्याची संपुर्ण माहिती मिळावी.

क) २००९ च्या महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. (F.D.W.१०८९/२४३/८९) नुसार गावठाण हद्दीमध्ये नदी ते निळी पुररेषा (म्हणजे निषेधक पुररेषा) बाधीत क्षेत्रामध्ये पाटबंधारे विभागाच्या अटीनुसार बांधकाम अनुज्ञेय आहे. असा सस्पष्ट उल्लेख असतांना त्याची अंमलबजावणी का होत नाही. का ते परिपत्रक मंजूर आहे अथवा नाही याचा खुलासा व्हावा.

ड) सबब ज्या ठिकाणी विकास योजना नकाशा व कंटूर नकाशातील पुररेषेमध्ये जास्त फरक नाही ते दोन्ही पैकी ज्या नकाशात नदी व निषेधक पुररेषा यातील अंतर जास्त आहे त्या अधारे विकास नियंत्रण करण्यात येते. मान्य प्रस्ताव दिनांक १७/०९/२०१० मधील Strigent of two नुसार तथापि चिंचवड गावठाणामध्ये उक्त दोन नकाशातील पुररेषेत फार मोठा फरक आहे. मंजूर विकास योजना नकाशानुसार चिंचवड गावठाणाचा संपूर्ण भाग निषेधक क्षेत्रात येत असल्याने या नकाशानुसार विकास योजना अभिप्राय देणेबाबत संभ्रमावस्था आहे. याबाबत अंतिम निर्णय काय झाला आहे ?

प्रश्न २. अ) पुररेषा निश्चिती नंतर नगररचना विभागाने नदी ते निळी पुररेषा तसेच निळी पुररेषा ते लाल पुररेषा दरम्यान विकास योजना अभिप्राय आजपर्यंत किती नागरिकांना दिलेले आहेत व नाकारलेल आहेत याची कारणासह यादी मिळावी.

ब) पिं.चिं.मनपाच्या डी.पी.वर निळी पुररेषा व लाल पुररेषा आखताना सदर ठिकाणचा तलांक (R.L.Level) ठरविलेली आहे. परंतु ब-याच जागांचे तलांक (R.L.Level) उंचावर असतांना त्या जागा निळया रेषेने बाधीत दाखविल्या आहेत. याचा अर्थ कंट्रर सर्व्हे नुसार पुररेषा आखणी झाली नाही. त्याबाबत पिं.चिं.मनपा व पाटबधारे विभागाने कोणते धोरण निश्चित केलेले आहे ?

प्रश्न ३. अ) पवना, इंद्रायणी, मुळा नदी उगमस्थानापासून महापालिका क्षेत्रा दरम्यान येणा-या सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषद, ग्रामपंचायत या हद्दीमध्ये पुरनियंत्रण रेषा निश्चित केलेली आहे काय ? व किती ठिकाणी त्यानुसार अंमजबजावणी सुरु आहे का ? याबाबत महानगरपालिकेकडे तपशील उपलब्ध आहे का ? याबाबत संपूर्ण सविस्तर माहिती मिळावी.

ब) सन २००५ ते २०१३ दरम्यान धरणक्षेत्रात पावसाळयामध्ये झालेल्या पावसाच्या नोंदीबाबत माहिती महानगरपालिकेकडे उपलब्ध आहे का ? त्याबाबतची संपूर्ण सविस्तर माहिती मिळावी.

क) सन २००५ ते २०१३ दरम्यान पवना धरणातून पावसाळयामध्ये किती क्युसेक्स पाणी सोडले गेलेले आहे. याबाबत वर्ष निहाय, दिननिहाय माहिती महापालिकेकडे उपलब्ध आहे का ? त्याबाबत संपूर्ण सविस्तर माहिती मिळावी.

ड) पिं.चिं.मनपाने पुररेषेचे पुनरसर्वेक्षण करणार असल्याची कार्यवाही सुरु केली आहे. हे पुररेषेचे पुनरसर्वेक्षण करीत असताना पुर्वीच्या सर्वेक्षणातील त्रुटी, चुका सुधारुन संबंधीत तज्ञांच्या सल्याने याबाबत नक्की फेरसर्वेक्षणामध्ये कोणकोणत्या बाबी येणार आहेत की जेणेकरुन पुन्हा पाटबंधारे विभागाकडे जावे लागू नये. याबाबत कोणती दक्षता घेतली आहे. याची सविस्तर माहिती मिळावी.

इ) पाटबंधारे विभागाने पुररेषेबाबत महानगरपालिकेस नकाशे दिले असतांना कित्येक प्रकरणाबाबत महापालिकेने पुन्हा ना हरकत प्रमाणपत्रासाठी नागरिकांना पाटबंधारे विभागाकडे अर्ज करण्यास सांगितले याचा खुलासा व्हावा व त्यावर पाटबंधारे विभागाने किती नागरिकांना व कशा आधारे नाहरकत प्रमाणपत्र दिले त्याची संपुर्ण माहिती मिळावी.